# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१

ईमेलव्दारे

क्रमांक कक्ष-१०(२)/तीन/प्र.क्र.१४०(१७-१८)/ २४८२
नागपूर ४४०००१ दिनांक ३०/१/२०१९

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन,शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्यआयोजना-पश्चिम, महाराष्ट्र राज्य,पुणे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),पूर्व-नागपूर, पश्चिम-मुंबई.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प नागपूर, चंद्रपूर व कोल्हापूर
मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
मुख्य वनसंरक्षक, कार्यआयोजना-पूर्व,नागपूर
वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे, नाशिक
वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया
वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, सर्व
वनसंरक्षक वनसंवर्धनतज्ञ,पुणे

विषयः- वनरक्षक, लिपीक, वाहन चालक, शिपाई व माळी इत्यादीचे बदली बाबत.

संदर्भः-१) महाराष्ट्र आरक्षण कायदा क्रमांक २००१.
२) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसीः-२००९ प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५.११.२००९.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/तीन/प्र.क्र.१४० (१७-१८) /१८२६, दिनांक २२.१२.२०१७.
४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/तीन/प्र.क्र.१४०(१७-१८)/ १४६२, दिनांक ६.९.२०१८.

कृपया संदर्भीय पत्र ३ व ४ चे अवलोकन होणेस विनंती आहे.

सरळसेवा प्रवेशासाठी शासन.सामान्य प्रशासन विभाग,निर्णय क्रमांक बीसीसी १०९७/ प्र.क्र.२/१६-ब, दिनांक २९ मार्च १९९७ अन्वये तसेच पदोन्नती साठी शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,दिनांक १८ ऑक्टोंबर १९९७ अन्वये स्वतंत्र बिंदूनामावली निश्चित करणे बाबत सूचना निर्गमित केलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक २ अन्वये शासनाने याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.महाराष्ट्र राज्य लोकसेवा(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम-२००१ मधील कलम ४ व ७ मधील आरक्षणाबाबत तरतूदीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सदर कायदयातील तरतूदीचा उल्लंघन केल्यास ९० दिवसाचे कारावासाची शिक्षेची व ५,०००/-रुपये पर्यंत दंड करण्याची तरतूद आहे.



Scanned by CamScanner

२.	वनरक्षक, लिपीक, वाहन चालक, शिपाई, माळी, इत्यादी संवर्गाचे बिंदूनामावली वनविभाग स्तरावर ठेवणे आवश्यक आहे. सदर संवर्गातील पदाचे बाबतीत पदभरती, आंतरविभागीय व आंतरवृत्तीय बदली करताना पदस्थापना बिंदू नामावलीनुसार त्याच प्रवर्गात करणे आवश्यक आहे. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेकडून एका विभागातून दुस-या विभागात बदली करतांना किंवा आंतर वृत्तीय बदलीने नियुक्ती करतांना संबंधित विभागात संबंधित नियुक्ती प्रवर्गात रिक्त जागा आहेत किंवा कसे याची खात्री करुन संबंधित प्रवर्गात रिक्त जागा असल्यासच पदस्थापना करणे आवश्यक आहे.याबाबत सूचनांचा उल्लघंन झाल्यास संबंधित अधिका-याचेवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल,याची कृपया नोंद घ्यावी व आरक्षण कायदाचा पालन करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी व याबाबत आपले अधिनस्त सर्व अधिकारी यांना लेखी कळवावी, ही विनंती.

तरी यापुढे वनरक्षक, लिपीक, वाहन चालक, शिपाई व माळी इत्यादी कर्मचा-यांचे एका वन विभागातून दुस-या वन विभागात बदलीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना संबंधित मुख्य वनसंरक्षक यांनी सदर प्रस्तावात त्या कर्मचा-याचा नियुक्ती प्रवर्ग कळविणे अनिवार्य राहील. तसेच ज्या विभागात बदली करावयाची / प्रस्तावित आहे, तेथे त्याच प्रवर्गाची जागा उपलब्ध आहे किंवा कसे हे प्रस्तावात स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील. उपरोक्त सूचना आपले अधिनस्त सर्व वन्यजीव विभाग,सामाजिक वनीकरण विभाग, प्रादेशिक विभाग इत्यादी अधिकारी यांना कळविण्यात यावे, ही विनंती.

(ए.आर.मंडे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

Scanned by CamScanner